बीड ।जालना। छत्रपती संभाजीनगर । पुणे । अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → रविवार दि.९ नोव्हेंबर २०२५ → वर्ष १० वे → अंक -१८३ → पाने ४ → किंमत २ रु

Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Sunday Date: 09 November 2025 → 10 th Year → 183 Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees

महाराष्ट्राचा महानायक

# लोकनायक

संपादक - भारत गायकवाड



# गली गली में शोर है ! पार्थ पवार चोर है !

## व्यवहार रद्द केला तरीही चोर तो चोरच!



**लोकनायक वृत्तसेवा** – महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या पार्थ पवार यांच्या जमीन खरेदी व्यवहाराचं प्रकरण गाजत आहे. पार्थ पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपूत्र आहेत. त्यांच्या अमोडिया कंपनीने पुणे कोरगाव पार्कमध्ये एक जमीन व्यवहार केला. हा जमीन व्यवहार वादात सापडला आहे. कारण बाजार भावानुसार १८०० कोटी रुपये मूल्य असलेली जमीन फक्त ३०० कोटी रुपयात दिली, असा आरोप झाला. त्यात मुद्रांक शुल्कापोटी काही कोटी रुपये भरणं अपेक्षित होते. पण तिथेच स्टॅम्प ड्युटी फक्त ५०० रुपये भरली गेली असा आरोप झाला. या जमीन व्यवहाराने अजित पवार यांच्या राजकीय अडचणी वाढवून ठेवल्या. अखेर काल हा जमीन व्यवहार रद्द करत असल्याचं अजित पवार यांनी जाहीर केलं.यावरुन राज्याच्या राजकारणात विविध मत व्यक्त होत असताना शरद पवार **पान २ वर**

## सुचना

दैनिक बीडचा **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोणतीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदाराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्द्ल लोकनंायक वृत्तपत्र समुह जवाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.

## बीड पोलिसांची मोठी कारवाई

# पेठ बीड पोलिस ठाण्याने ३ आरोपींना जिल्हाबाहेर हद्दपार केले!

**लोकनायक वृत्तसेवा** – बीड पोलिस दलाने पुन्हा एकदा कडक कारवाई करत पेट बीड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तीन गुन्हेगारांना जिल्हाबाहेर हद्दपार केल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.पोलीस ठाणे पेट बीड यांनी दाखल केलेल्या प्रस्तावानुसार, जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी (इंदिरानगर बीड) कविता जाधव यांनी पुढील आरोपींना जिल्हाबाहेर हद्दपार करण्याचे आदेश दिले आहेत.हद्दपार करण्यात आलेले आरोपी :निखिल किरण धावडे, राहणार पेट बीड - ०६ महिन्यांसाठी हद्दपार,शेख अथर शेख शकील, राहणार



अवलानगर पेट बीड - ०१ वर्षासाठी हद्दपार,सुनील गुनवंत राठोड, राहणार भोंई गल्ली पेट बीड - ०६ महिन्यांसाठी हद्दपार,या सर्व आरोपींवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून, त्यांच्या उपस्थितीमुळे कायदा-सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता असल्याने ही कठोर कारवाई करण्यात आली आहे.बीड जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. सलीम पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली, उपविभागीय पोलीस अधिकारी कविता जाधव, सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद पांडुर, पोलीस हवालदार सुप्रभात माने, नितीन शिर्के, तुकाराम चांदगुडे आणि अण्णासाहेब गिरी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून ही **पान २ वर**




# अंधारावर विजय मिळवणारी एक पणती, 'शिवप्रतापी' छत्रपती शिवाजी महाराजांसाठी

**लोकनायक वृत्तसेवा** – अतिशय प्रतिकूल परिस्थितीतमध्ये मोठ्या आत्मविश्वासाने स्वातंत्र्याचा हुंकार देण्यासाठी एक सार्वभौम स्वराज्य निर्माण करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांनी न भूतो भविष्यती असा महापराक्रम करुन स्वराज्यास बेचिराख करण्यासाठी आलेल्या अफझलखानाचा १० नोव्हेंबर १६५९ वध केलाच,पण एका क्षणात लाखो रुपयांची संपत्ती स्वराज्यात आनली , तो दिवस म्हणजे १० नोव्हेंबर हा शुभदिन म्हणून जगभर शिवप्रताप दिन साजरा होतो.छत्रपती शिवाजी महाराजांचे संकल्पीत स्वराज्य



केवळ रांगत असताना.विजापूरच्या आदिलशाहीचा सरदार आणि छत्रपती शिवाजी महाराजांमध्ये झालेल्या भेटित शिवाजी महाराजांनी त्याला वाघनखांनी उभा फाडुन वध करुन एका क्षणात लाखोंची संपत्ती स्वराज्यात आणली.या अभुतपुर्व महापराक्रमामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव सातासमुद्रापलिकडे साती खंडात दुमदुमूले.या आनंदाप्रतिर्थ जगभर शिवप्रताप दिन साजरा होत असताना बीड शहरात हि प्रतिवर्षा प्रमाणे यावर्षी सकल शिवप्रेमींच्यावतीने २११ राष्ट्रीयमार्गावरच्या **पान २ वर**

# एकनिष्ठतेची पोचपावती मिळावी - श्री पोपट धनवटे

**लोकनायक वृत्तसेवा** – पाटोदा तालुक्यातीत अमळनेर जिल्हा परिषद गटातून उमेदवारी मिळावी आणि त्या माध्यमातून एकनिष्ठतेची पोचपावती द्यावी अशी आग्रहाची मागणी माझी सरपंच पोपट धनवटे (कुसळंब,) हे विद्यमान आमदार श्री सुरेश धस( आण्णा ) यांच्याकडे करीत आहेत . अशी माहीती पोपट धनवटे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली यावेळी पत्रकारांशी बोलताना पोपट धनवटे पूढे म्हणाले की आण्णा चा आदेश इमाने इतबारे मानत कुसळंब ग्रामपंचायतीच्या माध्यमातून अनेक कामे केली आण्णानी विश्वास टाकल्या मूळे पाटोदा पंचायत समितीचे उपसभापती पद भूषविले त्या वेळी जनसंपर्क ठेवत जिल्हा परिषद गटातून व पंचायती च्या गणातून जनतेची कामे केली इच्छा असो अथवा नसो आण्णा सांगतील त्या उमेदवाराच्या पाठीशी राहून कामे करत राहीलो यावेळी अमळनेर या जिल्हा परिषद मतदार संघातून उमेदवारी देवून आमच्या . पाठीवर यशाचा आर्शीवाद. द्यावा अशी मागणी केली आहे जनतेचा व अमळनेर गटाचा आण्णावर असणारा विश्वास साध्य करण्यासाठी एकनिष्ठ कार्यकत्यास संधी द्यावी अशी पोपट धनवटे यांनी आण्णा कडे **पान २ वर**









# चुकीचे आरोप करून ओबीसी नेत्यांना संपविण्याचे कट कारस्थान तात्काळ थांबवा! - ॲड. सुभाष राऊत

**लोकनायक वृत्तसेवा** – ओबीसी समाजाच्या हक्काच्या आरक्षणासाठी उघडपणे बोलणाऱ्या ओबीसी नेत्यांवर चुकीचे आरोप करून त्यांचे राजकीय, सामाजिक अस्तित्व संपवण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्वयंघोषित नेत्यांनी स्वतःचे चारित्र्य तपासून दुसऱ्यांवर आरोप करण्यापूर्वी आपल्या आयुष्यात किती अंधार आहे याचा तपास करावा, स्वतःच्या संरक्षणासाठी समाजाचा आधार घेणाऱ्यांनी समाजाचे रक्षण करणाऱ्या नेत्यांवर आरोप करणे म्हणजे सूर्यावर गरळ ओकण्यासारखे आहे. आ. धनंजय मुंडे यांच्यावर अंधाधुंद आरोप करताना आरोप करणाऱ्याने स्वतःची पिलावळ सांभाळणे महत्त्वाचे आहे. कार्यकर्ते तुमचे, तुम्हाला देव मानतात, मग तुमच्या विरोधात कट कारस्थान रस्तात कसे? याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. अगोदर स्वतःचे पाय मुळे तपासा नंतरच ओबीसी नेत्यांवर आरोप करावेत.



ओबीसी नेत्यांना संपविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी अगोदर स्वतः किती चारित्र्यवान आहेत हे तपासावे असे खुले आवाहन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.गेल्या दोन वर्षापासून ओबीसी समाजातील नेत्यांचे सामाजिक, राजकीय खच्चीकरण करण्याचा प्रयत्न जातीवादी लोकांकडून होत आहे. मात्र अशा लोकांच्या भूलथापांना न डगमगता ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनरावजी भुजबळ साहेब ,आ. धनंजय मुंडे, ओबीसी समाजाचे हक्कासाठी सर्वतोपरी लढाई लढत आहेत. मात्र काही विघ्न संतोषी लोक या ओबीसी नेत्यांचे राजकीय, सामाजिक चारित्र्यहरण करण्याचा केविलवाना प्रयत्न करीत आहेत. या लोकांनी अगोदर स्वतःचे चारित्र्य तपासून पहावे नंतरच ओबीसी नेत्यांना लक्ष करावे असा सल्ला ॲड. सुभाष राऊत यांनी दिला आहे.

loknayak 09.11.2025:Copy of Layout 1 11/9/2025 1:29 AM Page 2



# खर्डा व परिसरातून सुनिल लोंढे यांच्या नावाला जनतेची पसंती;खर्डा जि.प.गटातून उमेदवारी करणार- सुनिल लोंढे


रिजवान बागवान - राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी संदर्भातील प्रतिक्षा अखेर संपली आहे.राज्य निवडणूक आयोगाने घेतलेल्या पत्रकार परिषदेत महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमाची अधिकृत घोषणा केली आहे.पहिल्या टप्यात नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणूका होणार असुन नंतर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे बिगुल वाजणार आहे.जामखेड तालुक्यातील नामांकित खर्डा जिल्हा परिषद गटातून व पंचायत समिती गणातून येथील भूमीपुत्र व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते श्री.सुनिल पांडूरंग लोंढे हे निवडणुकीच्या मैदानात उतरणार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटना व प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दिली आहे.श्री.सुनिल पांडूरंग लोंढे यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा.खा.राजु शेटटीसाहेब




यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी बांधवांच्या न्याय हक्कासाठी व त्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात वेळोवेळी आवाज उठवून प्रामाणिक असे काम केले आहे.खर्डा जिल्हा परिषद गटात स्वाभिमानी शेतकरी व प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांची मोठी फळी असुन त्यांच्या उमेदव-ारीसाठी जनतेतून अभिनंदन करित मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे.सर्वसामान्य नागरिक,शेतकरी बांधव,शेतमजुर वर्ग,कामगार वर्ग,अपंग बांधव,छोटे मोठे व्यवसायिक आदि.नागरिक श्री.सुनिल लोंढे यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे असुन त्यांनी उमेदवारी करावी असा आग्रह करित आहेत.श्री.सुनिल लोंढे यांचा खर्डा जिल्हा परिषद गटात मोठा जनसंपर्क असुन ते सामाजिक चळवळीमध्ये गेल्या १५ वर्षापासून सक्रिय काम करित आहेत.ते खर्डा जिल्हा परिषद गट किंवा पंचायत समिती गणातून निवडणूकीच्या मैदानात उतरणार असल्याने अनेकांचे ढाबे दणाणले आहेत

# सामाजिक कार्यकर्त्यांनी विवेकबुद्धीने काम करावे - विक्की वाणी

## राजेंद्र मस्के यांच्या वैयक्तिक खर्चातून पालवण-लिंबागणेश रस्ता दुरुस्ती सुरू





बीड प्रतिनिधी :पालवण ते लिंबागणेश या महत्त्वाच्या रस्त्याची दुरुस्तीची जबाबदारी शासनाची असतानाही, सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी वैयक्तिक खर्चातून या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू केले आहे.या कामामागील त्यांचा सामाजिक दृष्टिकोन आणि जनतेप्रती असलेली निष्ठा अनुकरणीय आहे, मात्र काही स्वयंघोषित समाजसेवक मात्र या कार्यावर राजकीय रंग चढवण्याचा आणि स्वतःची शेखी मिरवण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे. ङ्गविकासासाठी झटणाऱ्यांची बदनामी करून स्वतः प्रसिद्धी मिळवण्याचा उद्योग काही तथाकथित समाजसेवकांनी सुरू केला आहे. अशा लबाड प्रवृत्तींवर कोणीही विश्वास ठेव नये, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते विक्की वाणी यांनी केले आहेपालवण-लिंबागणेश हा रस्ता साधारण १९७२ पासून दुर्लक्षित होता. अनेक खेड्यांना जोडणारा हा रस्ता असूनही निधीअभावी दशकानुदशके दुरावस्थेतच होता.जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आल्यानंतर राजेंद्र मस्के यांनी या रस्त्याला प्राधान्य दिले आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजुरी मिळवून दिली.सुमारे आठ वर्षांपूर्वी या रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाले. नियमानुसार पाच वर्षे देखभाल एजन्सीकडे होती व त्या काळात तीन वेळा दुरुस्तीही करण्यात आली.यानंतर रस्ता अधिकृतपणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला असून सध्याची दुरुस्ती ही पूर्णतः शासनाची जबाबदारी आहे. ङ्गआज रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. जर काहींना समाजसेवेची खरी जाणीव असती, तर निधी मिळावा म्हणून आंदोलन करून प्रतिष्ठा खर्च केली असती; पण निवडणुका आल्या की बदनामीचे सत्र सुरू करणे, ही काही समाजसेवेची व्याख्या नाही,ङ्ग असे विक्की वाणी यांनी ठणकावून सांगितले.वास्तव जाणून घेतले पाहिजे. कोणत्याही आंदोलनाआधी अधिकृत माहिती घेणे गरजेचे आहे. बदनामी आणि अफवा पसरव-णाऱ्या प्रवृत्तींकडे दुर्लक्ष करून खऱ्या विकासाच्या पाठीशी उभे राहावे.लबाड समाजसेवकांना जनता ओळखते ज्यांनी समाजसेवेचे मुखवटे घातले आहेत, त्यांची वास्तवता जनतेला ठाऊक आहे. बदनामीचे राजकारण थांबवून जनहिताचे कार्य करा. विवेक, वस्तुनिष्ठता आणि प्रामाणिकपणा हाच खरा समाजसेवेचा पाया आहे.ङ्गलबाड समाजसेवकांना जनतेने ओळखून अशा लबाड प्रवृत्ती पासून जनतेने दूर राहावे असे आवाहन विकी वाणी यांनी केले आहे

HON'BLE SUBORDINATE COURT - PERIYAKULAM
(Periyakulam & TK, Theni DT, TamilNadu State 625601)
I.A No: 1/2024
In
M.C.O.P No: 66/2024

Seenivasan .. Petitioner /Petitioner

---vs---

1. Chamnar Anandra S/o Dnyanoba hindu aged about 15 years residing at Elda, Beed, Ambedjoati Tk, Maharashtra state
2. Dnyanoba father name unkown Hindu aged unkown residing at Elda, Beed, Ambedjoati Tk, Maharashtra state

(1st respondent is minor represented by father and her next friend Dnyanoba 6th Respondent )

Respondents / 1 and 6Respondents

In the above matter the petitioner filed guardian appointment petition in Motor accident damaged claim case, respondents are requested to appear before the Hon'ble SUBORDAINTE COURT PERIYAKULAM on 25-11-2025at 10.00am either in person or through your counsel, fail which in the matter will be decided in your absence and against.

Advocates - Periyakulam
S.Kamatchipandiyan M.A B.L
K.Subramaniyam B.Com B.L
9585408696
7418218224

HON'BLE SUBORDINATE COURT - PERIYAKULAM
(Periyakulam & TK, Theni DT, TamilNadu State 625601)
M.C.O.P No: 66/2024

Seenivasan Petitioner

---vs---

1. Chamnar Anandra S/o Dnyanoba hindu aged about 15 years residing at Elda, Beed, Ambedjoati Tk, Maharashtra state
2. Kalyan Salgar S/o Utham salgar, Govindhwadi Post, Mahathpuri tk, Parpani dt, Maharashtra state
3. S.Dhanaraj Khodve S/o Uttamrao salgar, Govindwadi, Mahatpuri, Gangakhed, Parbhani , Maharastr state
4. Dnyanoba father name unkown Hindu aged unkown residing at Elda, Beed, Ambedjoati Tk, Maharashtra state

(1st respondent is minor represented by father and her next friend Dnyanoba 6th Respondent )

1,2,3,6Respondents

In the above matter the petitioner filed Motor accident damaged claim case, respondents are requested to appear before the Hon'ble SUBORDAINTE COURT PERIYAKULAM on 25-11-2025 at 10.00am either in person or through your counsel, fail which in the matter will be decided in your absence and against.

Advocates - Periyakulam
S.Kamatchipandiyan M.A B.L
K.Subramaniyam B.Com B.L
9585408696
7418218224

## पान १ वरून

**गली गली में ...**

यांनी स्पष्टपणे या मुद्यावर आपलं मत मांडलं आहे. पार्थ पवार हे शरद पवार यांचे नातू आहेत. पार्थ पवार पुणे जमीन व्यवहार प्रकरणात चौकशी करुन वास्तव समाजासमोर ठेवलं पाहिजे, असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. पार्थ पवार प्रकरणी सुप्रिया सुळे यांनी अप्रत्यक्षपणे सौम्य भूमिका घेतली होती. त्यावर हे सुप्रिया सुळेंच व्यक्तिगत मत असू शकतं, असं शरद पवार म्हणाले. यावेळी शरद पवारांना पत्रकारांनी, अमोडिया कंपनीत १ टक्के भागीदारी असलेल्या दिग्विजय पाटील यांच्यावर गुन्हा दाखल होतो, पण ९९ टक्के शेअर असलेल्या पार्थ पवारांवर गुन्हा नाही, असं का? हा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी याचं उत्तर राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीसच देऊ शकतील असं शरद पवार म्हणाले.

**पेट बीड पोलिस...**

कारवाई पार पडली.पोलिसांच्या या कारवाईचे शहरात कौतुक होत असून, नागरिकांनी पोलिस प्रशासनाच्या या कृतीचे स्वागत केले आहे. बीड पोलिसांकडून गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी सुरू असलेली मोहिम पुढेही असंच प्रभावीपणे सुरू राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**अंधारावर विजय मिळवणारी...**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवतिर्थावर ' एक पणती छत्रपती शिवाजी महाराजांसाठी ' हा कार्यक्रम आयोजित केला आहे.अंधारावर विजय मिळवणारी पणती लावुन शिवप्रताप दिन साजरा करण्यासाठी बीड शहरातील सकल शिवप्रेमींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवतिर्थावर दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ठिक ६:०० वाजता यावे असे आवाहन आई तुळजाभवानी सामाजिक प्रतिष्ठाण.आणि सिताचंद्र ऑडिओ ॲडव्हर्टाईज.बीड.यांनी केले आहे

**एकनिष्ठतेची पोचपावती मिळावी...**

मागणी केली आहे त्याचे सहकारी देखिल माजी सरपंच पोपट धनवटे यांना उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्नशील आहेत असे पोपट धनवटे यांनी सोगितले

## पान ४ वरून

**नगर परिषदेसह...**

ठाकरे शिवसेना बहुजन समाजातल्या गोरगरीब कार्यकर्त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी नगर परिषद , जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत सर्व ताकदीने मैदानात उतरणार आहे. गेवराई नगर परिषद आणि गेवराई तालुक्यात ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांच्या बळावर चांगले यश मिळेल, अशी अपेक्षा शिवसेनेचे तालुका प्रमुख अजय दाभाडे यांनी व्यक्त केली आहे. गे-वराई तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद गट आणि पंचायत समितीच्या गणात शिवसेनेचे उमेदवार उभे करण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. गेवराई तालुक्यातील मित्र पक्ष, त्याच बरोबर, सम विचारी पक्ष संघटनेत काम करणाऱ्या नेत्यांशी आम्ही चर्चा करून, योग्य ठिकाणी महा आघाडीचे उमेदवार उभे त्यांना पूर्ण ताकद देणार असल्याची माहिती उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे ता.प्रमुख अजय दाभाडे यांनी दिली आहे.

**तर्कशक्तीचा चमत्कार...**

वार,आणि भविष्यातील घटनांचा वेध अचूकपणे सांगतात.त्यांनी २०२० सालीच भाकीत केले होते की, ङ्गआ.धनंजय मुंडे आणि लोकनेत्या पंकजाताई मुंडे मार्च २०२४ मध्ये पुन्हा राजकारणात एकत्र येतीलङ्घ, आणि हे भाकीत चपखल खरे ठरले!महाराजांना भूतकाळ आणि भविष्यकाळातील सण,वार आणि तारखा अगदी अचूक सांगण्याची चमत्कारिक किमया अवगत आहे. उदाहरणार्थ - २०४० साली ४ नोव्हेंबरला दिवाळी रविवार असेल,२०५५ साली २४ फेब्रुवारीला महाशिवरात्री बुधवार असेल,१९४७ साली ६ मार्चला होळी बुधवार होती,तर स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट शुक्रवार होता - अशा शेकडो उदाहरणांतून त्यांच्या अद्वितीय ज्ञानाची प्रचिती येते.राज्याच्या राजकारणापासून मानवाच्या आयुष्यापर्यंत - तर्क,श्रद्धा आणि अध्यात्म यांचे अनोखे मिश्रण मांडणारे लोखंडे महाराज हे आजच्या पिढीसाठी आदर्श आणि प्रेरणास्थान ठरत आहेत.

**जालना महानगरपालिकेच्या...**

आरक्षण निश्चित करण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि सार्वजनिक सहभाग सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने ही सोडत आयोजित करण्यात आली आहे. आरक्षणाची प्रारंभिक प्रसिद्धी सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५ करण्यात येणार आहे. त्यासाठी हरकती व सूचना दाखल करण्याची कालमर्यादा १७ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर २०२५ (दुपारी ३.०० वा. पर्यंत) महानगरपालिका मुख्यालय, निवडणूक विभाग, जालना येथे घेण्यात येणार आहे तर हरकती व सूचनांचा विचार २५ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्राप्त हरकती व सूचना विचारात घेऊन संबंधित निर्णय घेण्यात येणार आहेत. अंतिम आरक्षण प्रसिद्धी दिनांक २ डिसेंबर २०२५ राज्य सरकारच्या मंजुरी नंतर अंतिम आरक्षण अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल. जालना महानगरपालिका प्रशासनाने नागरिक, राजकीय पक्ष व इच्छुक उमेदवारांना या प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे, जेणे करून आरक्षण निर्धारणाची प्रक्रिया पारदर्शक आणि लोकसहभागातून पार पडेल या आरक्षणा नंतर सर्व विभागांची परिस्थिती समोर येणार आहे त्यामुळे सर्व राजकीय पक्ष आणि भावी नगरसेवकांचे लक्ष लागले आहे.

**श्रावण बाळ म्हणून...**

ओबीसी पुरुष आरक्षण असल्याने या गणातून शिवाजी काळे यांनी जिल्हा परिषद निवडणूक लढवावी अशी मागणी नागरिकाकडूनच होत असून प्रचारादरम्यान त्यांना नागरिकांचा उदंड असा प्रतिसाद मिळत आहे पुढील काळात भारतीय जनता पार्टीने आपणास या पदासाठी योग्य उमेदवार म्हणून निवड केली तर या गटा तुन मतदारांच्या विश्वासाला पात्र ठरून निवडणूक लढवून विजय प्राप्त करू असे मत शिवाजी काळे ही व्यक्त करत आहेत एक राजकारणातील लोकांच्या कामाची आवड असणारा तरुण म्हणून शिवाजी काळे यांना ओळखले जाते

**रोड रॉबरी प्रकरणात...**

जखमी अवस्थेत फिर्यादीने गाडी घेऊन कझ पेट्रोल पंपावर जाऊन मदत मागितली आणि त्यानंतर त्यांना डठढठ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.या घटनेवरून नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २५७/२०२५ नोंद करण्यात आला. सदर गुन्हा भारतीय न्याय संहिता, २०२३ (इछड) अंतर्गत कलम ३(५) - दरोडा (ठेललशी) आणि कलम ३०९(६) - जखमी करणे व जबरदस्तीने मालमत्ता घेणे या कलमांन्वये नोंदविण्यात आला आहे.पोलिसांनी संशयित आरोपी सोनू जाधव व जयपाल भालेराव यांना तपासादरम्यान दिनांक २६/०९/२०२५ रोजी अटक केली आणि न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने आरोपींना पोलीस कोठडीत ठेवून चौकशी करण्याची परवानगी दिली. तपास पूर्ण करून पोलिसांनी न्याया लयीन कोठडी मागितली यानंतर आरोपींनी जामिनासाठी जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथे अर्ज दाखल केला. सदर अर्जावर सविस्तर सुना-वणी झाली. आरोपींच्या बाजूने ॲड. योगेश टेकाडे पाटील यांनी सशक्त आणि कायदेशीर युक्तिवाद सादर करत, आरोपींना अनावश्यक तुरुंगवास देऊ नये अशी मागणी केली.यावर सखोल विचार करून मा. दुसरे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश सौ. सुरेखा शिंदे मॅडम यांनी दोन्ही आरोपींना जामीन मंजूर करण्याचा आदेश दिला.सदर निर्णयामुळे आरोपी व त्यांच्या कुटुंबीयांना दिलासा मिळाला असून, या प्रकरणाकडे संपूर्ण जिल्ह्यातील कायदा व न्यायव्यवस्थेतील वतुर्ळाचे लक्ष लागले होते. प्रकरणाच्या गंभीरतेनुसार दोन्ही बाजूने तीव्र युक्तिवाद झाले, मात्र न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून न्यायोचित निर्णय दिला.या संपूर्ण प्रक्रियेत ॲड. योगेश टेकाडे पाटील यांनी प्रकरणाचे बारकाईने विश्लेषण करून कायदेशीर मुद्दे मांडले. त्यांना ॲड. वैभव होळकर यांनी संपूर्ण सहाय्य केले.न्यायालयाने आरोपींना ठराविक अटींवर जामीन मंजूर करत पुढील सुनावणीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले.

**अंशतः अनुदानित...**

अनुदाना प्रमाणे ऑक्टोबर महिन्याचे वेतन या शाळेतील सर्व शिक्षकांनी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचे काम तातडीने करून दिल्याबद्दल आज शुक्रवार दिनांक ७ रोजी बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने वतीने शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम, उपशिक्षणाधिकारी श्री तुरुकमारे यांच्यासह पे युनिटचे अधीक्षक श्री राजेश खटावकर, वरिष्ठ मुख्य लिपिक श्री चाटे आणि वरिष्ठ लिपिक श्री खडकीकर यांचा सत्कार विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा अध्यक्ष श्री. वैजनाथ चाटे सर, छत्रपती संभाजीनगर कार्याध्यक्ष श्री जितेंद्र डोंगरे सर, बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर, श्री बाळासाहेब नागरगोजे सर, श्री. सुरेश कदम सर, श्री. खाडे सर, श्री. नामदेव मुंडे सर, श्री. शेख सर, श्री. गंगार्डे सर, श्री. लहाने सर यांनी केला. या सत्कार प्रसंगी बोलताना शिक्षणाधिकारी श्रीमती प्रिया राणी मॅडम म्हणाल्या की, मी बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहे. विशेष म्हणजे विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शिक्षकांच्या प्रश्नांबद्दल मला जाण आहे. त्यांचा खडतर संघर्ष आहे याची मला कल्पना आहे. त्यामुळे या शिक्षकांच्या आणि त्यांच्या कुटुंबाप्रती मला सातत्याने सहानुभूती निर्माण होते. त्यामुळे त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी पुढाकार घेऊन सदैव प्राधान्य देत असते, यापुढेही प्राधान्याने अंशतः अनुदानित आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षकांचे प्रश्न मार्ग लावण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. यावेळी विनाअनुदानित शाळा कृती समितीचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नामदेव मुंडे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री सुरेश कदम मामा यांनी मानले.

loknayak 09.11.2025:Copy of Layout 1 11/9/2025 1:29 AM Page 3



# अकाश शेठ बाफना यांच्या सौभाग्यवती पायलताई बाफना नगराध्यक्षा पदासाठी प्रबळ दावेदार

## जामखेड करांच्या पसंतीस उतरलेल्या बाफना यांना कोणता पक्ष संधी देणार

**लोकनायक वृत्तसेवा –** जामखेड शहरातील आदर्श फाउंडेशनचे अध्यक्ष आकाश शेठ बाफना यांच्या सौभाग्यवती पायलताई बाफना या आगामी नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्षा पदासाठी इच्छुक उमेदवार म्हणून चर्चेत आहेत. त्या निवडणूक लढविण्यास तयार असून, संधी मिळाल्यास जामखेड शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.पायलताई बाफना म्हणाल्या, ङ्गशहरातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, आरोग्यसेवा बळकट करणे तसेच रस्ते, पाणी, वीज आणि स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधांचा विकास करणे हे माझे प्राधान्य असेल. फक्त एका प्रभागापुरते नव्हे, तर संपूर्ण जामखेडचा सर्वांगीण विकास हा माझा उद्देश आहे.आणि तशी विकासाची ब्ल्यू प्रिंट सुधा तयार आहे.पायलताई बाफना या नगराध्यक्षा पदासाठी निवडणूक लढविण्यास ठाम आहेत;

मात्र त्या कोणत्या पक्षातून निवडणूक लढविणार याची उत्सुकता नागरिकांमध्ये आहे. आदर्श फाउंडेशनच्या माध्यमातून आकाश शेठ बाफना यांनी शहरात विविध विकासकामे आणि सामाजिक उपक्रम राबविले आहेत. सध्या तरी जामखेड मध्ये चर्चेत असलेले आदर फाउंडेशन चे आकाश बापना यांनी शहरासह वाडी वस्तीवर हजारो ब्रास मुरमीकरण केले आहे. तसेच अनेक ठिकाणी लाईटची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. अनेक शाळांमध्ये चिखलांचे साम्राज्य होते तेथे मुर्गीकरण केले पूलांची दुरुस्ती केली रस्ते चांगले केले तसेच नवरात्र उत्सवामध्ये महिलांसाठी




मोफत मोहटा देवी दर्शन घडवले. याच बरोबर तीस वर्षापासून जामखेड ते पंढरपूर संपूर्ण दिंडी नियोजन ते करतात. त्यामुळे बाफना दांपत्याबद्दल नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण आहे.

दरम्यान, आगामी निवडणुकीत आमदार रोहित पवार नवीन चेहऱ्यांना संधी देणार का राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाचे सध्या चर्चेत असलेली नावे म्हणजे अर्चनाताई संपत राळेभात, संध्या शहाजी राळेभात,कोमल बिभीषण धनवडे, राजेंद्र कोठारी यांच्या सौभाग्यवती ही नावे चर्चेत आहेत आता आमदार रोहित पवार हे यापैकी एकाला तिकीट देणार की नवीन चेहरा जनतेच्या पसंतीच उतरलेल्या पायल ताई आकाश बाफना यांना संधी देणार अशी चर्चा सध्या सुरू आहे.❊सभापती प्रा. राम शिंदेंची भूमिका प्राध्यापक राम शिंदे साहेब हे थेट जनतेतून नगराध्यक्षा पदासाठी जनतेच्या मनातील उमेदवार देणार का सध्या भाजपकडून चर्चेत असलेली नावे सौ सुनीता मधुकर (आबा) राळेभात, सौ प्रांजलताई अमित चिंतामणी, सौ रोहिणीताई संजय काशीद यांच्या सौभाग्यवती यांची नावे चर्चेत आहेत

सभापती प्राध्यापक राम शिंदे साहेब हे यापैकी एकाला तिकीट देणार की जनतेच्या पसंतीच उतरलेल्या पायल ताई आकाश बाफना यांना संधी देणार अशी चर्चा सध्या सुरू आहे.जामखेडमध्ये आकाश शेठ बाफना आणि पायलताई बाफना हे लोकपसंतीचे उमेदवार ठरत असून, त्यांच्या पुढील राजकीय भूमिकेकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# नवीन बिना बौद्ध विहारात विद्यार्थी दिन साजरा

**लोकनायक वृत्तसेवा –खापरखेडा : स्थानिक नवीन बिना बौद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहूल नवयुवक संघ शाखा नवीन बिना, भानेगांव यांच्या**



**संयुक्त विद्यमाने ७ नोहेंबर ला विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन, विद्यार्थी दिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरवात सल्लागार समितीचे तुळिशराम बागडे, मनोहर गजभिये, कृष्णाजी वासनिक, भैयाजी सोनटक्के, किशोर चव्हाण, अरुण नारनवरे, यांच्याहस्ते विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्राला माल्यार्पण व बुद्ध वंदना घेवून करण्यात आली. भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले परंतु वर्तमान काळात त्यांच्या द्वारा लिखित संविधानाने तळागाळातील लोकांसहित सर्वांसाठी शिक्षणाचे दालान उघडे केले आहे. त्याचा सर्वांगीण विकासाकरिता सदुपयोग करूण घेण्याचे आव्हान केले. मिना नरेश ढोके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विषम परिस्थिती मध्ये घेतलेल्या शिक्षणाची माहिती देत गीताच्या माध्यमातून आपले विचार व्यक्त केले.याप्रसंगी उपाध्यक्ष अनिल लांजेवार, सचिव मूकेश बागडे, हिशोब तपासणीस नरेश डोंगरे, तनिष्क वासनिक, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळाच्या कांता बागडे, अंजना मेश्राम, निर्मला चिमणकर,वच्छला गणविर, सत्यफुला कांबळे, मिना मेश्राम, साजिता तागडे व बहुसंख्येने विद्यार्थी, पालक व नागरिक उपस्थित होते, कार्यक्रमाचे प्रास्ताविक सारिका तागडे, संचालन कल्पना वासनिक तर आभार कोषाध्यक्ष रविन्द्र ढोके यांनी मानले.**

# केज नगरपंचायतच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी जिल्हा नियोजन मधून ६ कोटी ३० लक्ष रुपयाचा निधी मंजूर

**लोकनायक वृत्तसेवा –**केज नगरपंचायतच्या माध्यमातून केज शहराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी जिल्हा नियोजन अंतर्गत ६ कोटी ३० लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध कित्येक वर्षापासून केज शहर विकासापासून कोसो दूर होते परंतु गेल्या तीन-चार वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे जेष्ठ नेते हारुणभाई इनामदार व कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा सौ□.सीताबाई बनसोड यांच्या आथक परिश्रमाने केज शहराचा चेहरा मोहरा बदलताना दिसत आहे. यावेळी आम्ही पाहिलेले स्वप्न साकारताना दिसत असल्याचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी बोलताना आपले मत व्यक्त केले. याचबरोबर केज शहरात विविध विकासकामे गेल्या तीन-चार वर्षात होत आहेत आणि काही कामे प्रगतीपथावर आहेत.

यावेळी बोलताना पाण्याचा प्रश्न मोठा गंभीर असतानाही आम्ही संकटाला तोंड देत केज वासियांना पाणीपुरवठा करत आहोत यात पाणीपुरवठ्याची योजना अंतिम टप्प्यात असून या कामासाठी १ २ ९ माध्यमातून कोटींची



### राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांच्या प्रयत्नाला यश

योजना तांत्रिक मान्यता पर्यंत मंजूरी साठी अंतिम टप्प्यात आहे.

काही दिवसात हे काम प्रत्यक्षात चालू होईल असे मत हारुणभाई इनामदार यांनी बोलताना स्पष्ट केले. तर केज शहराच्या स्वच्छतेसाठी स्वच्छता ग्रह बांधण्याचा निर्धार करण्यात आला आहे यामुळे स्वच्छ शहर सुंदर शहर या झाल्याशिवाय राहणार नाही यामध्ये बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच आमदार नमिताताई मुदडा खासदार रजनीताई पाटील रमेश रावजी आडसकर यांच्या प्रयत्नामुळे केज शहराला निधी उपलब्ध झाला असे मत व्यक्त करून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री यांनी आम्हाला जिल्हा नियोजना मधुन निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल दादांचे आभार व्यक्त केले. केज शहरातील विकास कामे ही दलित वस्ती सुधारण्यासह मूलभूत कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून शहरात ज्या भागांमध्ये दलित वस्ती आहे अथवा दलित नागरिक हे ज्या भागात राहतात. या निधीमुळे शहराच्या विकासाला एक नवी दिशा मिळाली. मागील तीन ते चार वर्षापासून ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या प्रयत्नातून केज शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करण्यात आला असून जिल्हा अधिकारी कार्यालयाच्या नगरपरिषद प्रशासन विभागाने एकाच दिवशी तीन प्रमुख योजनेतील कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. सहा कोटी तीस लक्ष रुपयाचा निधी दिल्यामुळे केज शहराच्या विकासासाठी भर पडली असून या मंजूर निधीमध्ये महाराष्ट्र नगरोत्थान महाबियन जिल्हास-तरीय,

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरिक दलित वस्ती सुधार योजना आणि नागरी दलिततेत्तर वस्ती सुधार योजना या महत्त्वाच्या तीन योजनांचा समावेश आहे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना व अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांची लोकसंख्या असलेल्या वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी हा निधी वापरण्यात येणार आहे व शहरातल्या अन्य भागात मूलभूत सुविधा साठी निधीचा वापर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर शहरातील अनेक ठिकाणचे नाल्या,रस्ते, पिण्याच्या पाण्यासाठी पाईपलाईन, स्वच्छता, शहरातील काही मुख्य रस्ते तर काही जोड रस्त्यांचे कामे पूर्ण झालेले आहेत तर उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत व उर्वरित कामे मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत लवकरच केज शहराच्या विकासासाठी आम्ही वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्यांनी शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करणार आहोत असे नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी बोलताना स्पष्ट केले,

# दिग्गज पैसेवाल्यांच्या विरोधात नगरपरिषदेची निवडणूक आप लढणार साध्या पद्धतीने! मतदारांच्या प्रेरणेने राजकारणातील नवीन प्रयोग!- बोरसे गुरुजी



**लोकनायक वृत्तसेवा –**भोकरदन शहरांमध्ये अनेक दिग्गज आहे, करोडपती आहे. पैशांने जरी हे लोक अतिशय श्रीमंत असले तरी मनाने अतिशय गरीब आणि स्वार्थी आहे.आतापर्यंत गरीब जनतेचा यांनी गैरफायदा घेतलेला आहे. भरपूर पैसा खर्च करणे, निवडून येणे, नगर परिषदेचा निधी आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी आपल्या व्हीआयपी प्लॉटिंग साठी वापरणे, कुटुंबासाठी निधी वापरणे हे यांचे आजपर्यंतचे उद्योग आहे. यामध्ये अनेक पडद्यामागचे सूत्रधार सुद्धा सामील आहे. त्यामध्ये मग नगरपरिषदेची सत्ता भोगणारे असो किंवा न भोगणारे असो त्यांनी सुद्धा दलाली करून कमिशन घेऊन अधिकाऱ्यावर दबाव आणून स्वतःच्या पोळ्या भाजून घेतलेल्या आहे. गरीब जनतेच्या साध्या स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पाणी, रस्ते, नाल्या इत्यादी मूलभूत सुविधा हे लोक देऊ शकलेले नाही. पदावर असणारे, पद भोगणारे सुद्धा स्वतः जनतेसाठी काहीच करू शकले नाही. निवडुण आल्यावर नगरसेवकांना न विचारता कारभार केला जातो. विश्वासात घेतले जात नाही असे अनेक माजी नगरसेवक सांगतात. उलट पक्षी गेल्या चार वर्षापासून आम आदमी पार्टीने शहरांमध्ये अतिशय संघर्ष करून घराघरापर्यंत घंटागाड्या पोहोचल्या आहे. नागरी सुविधांच्या बाबतीत नगरपरिषद प्रशासनाला धारेवर धरून अनेक कामे करून घेतली. प्रशासनाला अक्षरशः सळो की पळो करुन सोडले. त्यावेळेस हे सर्व दिग्गज आणि स्वार्थी लोक आम आदमी पार्टीची फक्त गंमत पाहत होते. टिंगल टवाळी करत होते. आम आदमी पार्टीचे कार्यकर्ते मात्र जनतेच्या घराघरापर्यंत गल्लीबोळामध्ये जाऊन समस्या जाणून घेऊन त्यावर संघर्षात्मक पवित्रा घेत होते. त्याचा बऱ्याच समस्या सोडवुन जनतेला फायदा झाला. नगर परिषदेच्या मालमत्ता इमारती, गाळे, साहित्य, गाड्या, ओपन स्पेस इत्यादीकडे नगर परिषदे प्रशासनाचे लक्ष वेधून नुकसान व संबंधित थकित वसुली करण्यासाठी सुद्धा मागणी केली आहे. शहरातील मतदारांचा कल आम आदमी पार्टीच्या बाजूने असून पार्टीने ठरवले आहे की, अतिशय साधे, स्वच्छ समाजसेवी वृत्तीचे उमेदवार नगरपरिषदेमध्ये उभे करायचे आहे. साध्या पद्धतीने प्रचार करायचा, कोणताही जास्तिचा खर्च करायचा नाही, विचार बदलाचे राजकारण करुन जर जनतेने कौल दिल्यास या सर्व दिग्गजांना कारभार कसा करतात आणि समाजसेवा करून जनतेला सुविधा कशा देता येतात सर्व गोष्टी यांना दाखवून द्यायचे आहेत. शहरातील मतदार कर्मचारी, वकील, डॉक्टर, शिक्षक, इंजिनिअर, सेवानिवृत्त कर्मचारी आजी-माजी सर्व सेवक आम आदमी पार्टीच्या या प्रयोगाला प्रतिसाद देतील आणि खर्च न करता आम आदमी पार्टीची सत्तानगर परिषदेमध्ये आली तर जनतेला एक रुपयाही खर्च करू न देता व कार्यालयात हेलपाटे न घालता सर्व सुविधा घरपोच देण्यात येतील. त्याबरोबरच ‘ स्वच्छ शहर सुंदर शहर‘ केळना नदीचे सुशोभिकरण, शिक्षण, आरोग्य, विज, पाणी, रस्ते, नाल्या इत्यादी बाबतच्या सुविधा व्यवस्थित आणि टापटीप देण्याचा मानस असून मतदार साथ देईल असा विश्वास आम आदमी पार्टीचे जिल्हा सचिव बोरशे गुरुजी, उपाध्यक्ष महजाद खान, कार्यकारणी सदस्य भगवान पालकर यांनी व्यक्त केला असून जनतेची लढाई लढून करोडपती पुढाऱ्यांना हरवण्याचा विडा उचललेला आहे. ज्या लोकांना या सर्व गोष्टी आवडतात असे सर्व साधे स्वच्छ समाजसेवक वृतीची उच्चशिक्षित, स्वयंभू कोणत्याही नेत्यावर अवलंबून नसलेले उमेदवार जर आम आदमी पार्टीला ए बी फॉर्म ची मागणी करतील तर अशा लोकांना आम आदमी पार्टी सपोर्ट करून ए बी फॉर्म उपलब्ध करून देणार आहे. बावीस इच्छुक उमेद्वारांची यादी पार्टिच्या वरिष्ठांकडे पाठवीण्यात आलेली आहे.

# अर्जुनराव गायकवाड यांचा मतदार भेटी वर भर



**लोकनायक वृत्तसेवा –** नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरदचंद्र पवार राष्ट्रवादी गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अर्जुनराव गायकवाड यांनी शहरातील प्रभागनिहाय उमेदवार निश्चित करून मतदारसंघांमध्ये सक्रिय जनसंपर्क मोहीम सुरू केली आहे. धारूर शहर पिजून काढत त्यांनी मतदाराच्या गाटी भेटी वर भर दिला मतदारकडून त्यांना उदंड असा प्रतिसाद मिळत आहे

अर्जुन गायकवाड यांनी नगराध्यक्ष असताना धारूर शहरामध्ये जनहिताची केलेली कामे एक धाडसी नगराध्यक्ष म्हणून त्यांनी मिळवलेली ख्याती या बाजू त्यांच्यासाठी प्रचार काळादरम्यान जमेच्या ठरत असून प्रचारादरम्यान नागरिकाकडून त्यांना उदंड असा प्रतिसाद मिळत आहे परत एकदा नगराध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी द्या धारूर शहराचा चेहरा मोहरा विकास कामाच्या माध्यमातून बदलून टाकू मतदारांना कुठल्याही प्रकारच्या तक्रारी करण्याची संधी राहणार नाही असे आश्वासन ते मतदारांना देत आहे प्रत्येक वार्डात कार्यकर्त्यांसह बैठका घेत मतदारांशी थेट गाठीभेटी सुरू केल्या असून, त्यांच्या प्रचाराला उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.प्रत्येक प्रभागातील उमेदवार निश्चित झाल्याने या गटाच्या प्रचाराला अधिक बळ मिळाले आहे. दुसरीकडे, इतर पक्षांचे उमेदवार अद्याप निश्चित न झाल्याने शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसने शहरातील प्रचारात स्पष्ट आघाडी घेतल्याचे चित्र दिसत आहे.

# मोहपुरी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**लोकनायक वृत्तसेवा –**मोहपुरी ता. घनसावंगी येथे श्री संत भीमसिंह बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे यात रविवार ( ता. नऊ ) रोजी सुधाकर महाराज वाघ, सोमवार ( ता.दहा) रोजी आदिनाथ महाराज लाड, मंगळवार ( ता. अकरा ) रोजी अतुल महाराज शास्त्री यांची कीर्तनाची कार्यक्रम होणार आहे तर बुधवार (ता. १२) रोजी श्री संत भगवान गडाचे भगवान गडाचे मठाधिपती न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन होणार आहे यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे तसेच नियमित श्रीमदब भागवत कथा अनिल महाराज जोशी हे यांचे पारायण होणार आहे याबरोबरच विष्णुसहस्रनाम, काकड आरती, भजन, जागर, हरिपाठ आदी कार्यक्रम संपन्न होणार आहे तरी या कार्यक्रमाचा परिसरातील नागरिकांनी भाविकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

लोकनायक
रविवार दि.९ नोव्हेंबर २०२५


# झोपडीतून सुवर्णकुस्तीपटू बनलेला सनी फुलमाळी बहरैनमध्ये आशियाई युवा स्पर्धेत ६० किलो गटात सुवर्णपदक

## आष्टी तालुक्याची मान उंचावल्याने आ. सुरेश धस यांच्याकडून अभिनंदन व कौतुक

**लोकनायक वृत्तसेवा –** आष्टी तालुक्यातील पाटसरा येथील सनी फुलमाळीने बहरैनमध्ये झालेल्या आशियाई युवा कुस्ती स्पर्धेत ६० किलो गटात सुवर्णपदक पटकावत भारताचा झेंडा अभिमानाने फडकावला आहे. झोपडीत वाढलेला आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करत सनीने मिळवलेलं हे यश सर्वांसाठी प्रेरणादायी ठरलं असून बहरैनमध्ये आशियाई युवा स्पर्धेत ६० किलो गटात सुवर्णपदक पटकावत मोठे यश संपादन केले आहे.यशाबद्दल आष्टीमतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी अभिनंदन करत सनीचे कौतुक केले आहे. सनीचा परिवार गेल्या १५ वर्षांपासून लोहगाव परिसरात वास्तव्यास आहे. वडील सुभाष फुलमाळी नंदीबैल घेऊन भविष्य सांगतात, तर आई सुई-दाभण विकून उदरनिर्वाह करतात.अशा परिस्थितीतही सनीने हार न मानता कुस्तीच्या माध्यमातून जीवन बदलवण्याचा निर्धार केला आणि आज तो देशाचा मान उंचावणारा सुवर्णपदक विजेता ठरला आहे.सनीचा कुस्तीप्रवास आजोबांच्या काळापासून सुरू झाला. वडिलांनाही कुस्तीची आवड होती, मात्र आर्थिक अडचणींमुळे ती थांबवावी लागली. तरीही माझी मुलं पैलवान व्हावीत ही त्यांची इच्छा कायम राहिली. त्यांनी आपल्या तीन मुलांना भैय्या, बादल आणि सनी यांना स्वतः प्रशिक्षण दिलं. झोपडीजवळच्या माळरानावर तात्पुरती तालीम उभारून सुभाष फुलमाळी मुलांना सराव शिकवत असत. सनीचा खेळ



पाहून रायबा तालीमचे वस्ताद पै. सोमनाथ मोझे आणि सदाशिव राखपसरे यांनी त्याला मार्गदर्शन सुरू केलं.

पुढे लोणीकंद येथील जाणता राजा तालीममध्ये वस्ताद संदीप भोंडवे यांच्या प्रशिक्षणाखाली सनी अधिक परिपक्व झाला. वस्ताद भोंडवे यांनी त्याला दत्तक घेत सर्व खर्च उचलत सनीचं भविष्य घडवलं.सध्या सनी दहावीमध्ये शिक्षण घेत असून, महाराष्ट्र चॅम्पियनशिपमध्ये विजेतेपद आणि राष्ट्रीय स्पर्धेत रौप्यपदक जिंकल्यानंतर आता आशियाई युवा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत देशाचा गौरव वाढवला आहे.आष्टी मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांनी सनीचं अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या असून लवकरच त्याचा सत्कार आयोजित केला जाणार आहे.

**अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उभं राहून आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळवणं ही मोठी कामगिरी आहे. सनी फुलमाळीने आपल्या मेहनती, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आष्टीचं नाव उज्वल केलं आहे.अशा तरुण खेळाडूंना प्रोत्साहन देणं ही आपली जबाबदारी आहे. सनीचं हे यश ग्रामीण भागातील असंख्य तरुणांना प्रेरणा देणारं आहे. लवकरच त्याचा गौरव करून सन्मान केला जाणार आहे.**

## तर्कशक्तीचा चमत्कार,अध्यात्माचा अविष्कार!

### पाटोद्यातील राजेंद्र 'लोखंडे महाराज' यांना 'समाजरत्न' पुरस्काराने गौरव!

**आष्टी लोकनायक वृत्तसेवा –** पाटोदा तालुक्यातील अध्यात्म, तर्कशास्त्र आणि भाकीतशक्तीचा अद्भुत संगम असलेले व्यक्तिमत्व – राजेंद्र गंगाराम लोखंडे उर्फ लोखंडे महाराज – यांना त्यांच्या विलक्षण कार्य,अद्वितीय तर्कशक्ती आणि समाजातील योगदानाबद्दल 'समाजरत्न पुरस्कार' जाहीर



झाला आहे.दिघोळ (ता.पाटोदा) येथील रहिवासी असलेले लोखंडे महाराज काही वर्षांपूर्वी शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने पाटोद्यात स्थायिक झाले. शालेय जीवना-पासूनच अध्यात्मिक प्रवृत्ती असलेले महाराज हे खेमानंद महाराज यांचे शिष्य असून,पुढे ह.भ.प.रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत त्यांनी कार्य केले. एम.ए.पर्यंत शिक्षण पूर्ण करूनही त्यांचे लक्ष सदैव अध्यात्म आणि आत्मज्ञानाकडेच केंद्रित राहिले.ब्रहमचारी जीवन जगणारे लोखंडे महाराज यांच्याकडे एक अद्भुत तर्कशक्ती आहे – समोर आलेल्या व्यक्तीचा चेहरा पाहताच ते त्या व्यक्तीची जन्मतारीख,**पान २ वर**

## नगर परिषदेसह जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत पक्षाची ताकद दाखवू – अजय दाभाडे

**लोकनायक वृत्तसेवा –** गेवराई नगर परिषद , जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत प्रस्थापित पुढाऱ्यांच्या विरोधात लढा उभारून, शिवसेना पूर्ण ताकदीने निवडणुक लढविणार असून, गोरगरीब समाजातील घटकांसाठी लढणाऱ्या उमेदव-ारांच्या पाठिशी उभे राहून पक्षाची ताकद दाखवू , असे



प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुका प्रमुख अजय दाभाडे यांनी येथे केले.गेवराई शहरात गुरूवार ता. ६ रोजी संपर्क प्रमुख परशुराम जाधव, जिल्हा प्रमुख विलास भैय्या गिराम यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर किरण सुतार, साईनाथ सुतार, संतोष नवले, जम्मू सय्यद, जलील पठाण, विशाल घोडे, परशुराम बजगुडे, अफसर शेख यांची उपस्थिती होती. अजय दाभाडे यांनी सांगितले की, महा विकास आघाडी सोबत लढायची आमची तयारी आहे. नसता, स्वबळावर ताकदीने निवडणुक लढविणार आहोत. उद्धव बाळासाहेब **पान २ वर**

## जालना महानगरपालिकेच्या भावी नगरसेवकांचे आरक्षण ११ नोव्हेंबर रोजी

**जालना/लोकनायक –**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शनानुसार आणि अधिसूचनेनुसार जालना महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून जालना महानगरपालिकेच्या भावी नगरसेवकांचे आरक्षण ११ नोव्हेंबर रोजी जाहीर होणार आहे.सदर सोडत कार्यक्रम ११ नोव्हेंबर २०२५ (मंगळवार) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथील सभागृहात पार पडणार असून, या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मा. आशिमा मित्तल (भा.प्र.से.) भूषवणार आहेत. महानगरपालिकेतील अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), मागासवर्गीय प्रवर्ग (महिला) तसेच सर्वसाधारण महिला या प्रवर्गांसाठी **पान २ वर**

## श्रावण बाळ म्हणून काम करणारे सरपंच आता जिल्हा परिषद निवडणुकीच्या रणांगणात



**किल्ले धारूर लोकनायक वृत्त-सेवा –** धारूर तालुक्यातील सुरनर वाडी या ठिकाणी मागील दहा वर्षापासून सरपंच पदाची धुरा सांभाळणारे शिवाजी काळे आता जिल्हा परिषद असरढोह गणातून निवडणूक लढवण्याच्या तयारीत असून या भागातील मतदार त्यांनी हे निवडणूक लढवावी यासाठी आग्रही असताना दिसून येत आहेत. शिवाजी काळे यांनी आपल्या सरपंच पदाच्या काळात शासनाच्या योजना जनतेच्या दारी या संकल्पनेच्या माध्यमातून आतापर्यंत दोन ते तीन हजार लोकांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून दिला आहे योजना कोणती का असेना परंतु लोकांना त्याचा लाभ मिळालाच पाहिजे हे तत्व स्वीकारून आलेल्या अनेक आलेल्या अनेक अडचणीवर मात करून त्यांनी जनतेच्या पदरी शासनाच्या योजना मिळवून देण्याचे मोठे काम केले आहे यावेळी असरढव ज़िल्हा परिषद गटा तुन **पान २ वर**

## अंशतः अनुदानित शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्राधान्य – श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम

### अंशतः अनुदानित शाळांच्या वतीने शिक्षणाधिकारी मॅडम आणि वेतन अधीक्षक खटावकर यांचा सत्कार

**लोकनायक वृत्तसेवा –** जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील असते. विशेष म्हणजे विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शिक्षकांच्या प्रश्नांना सदैव प्राधान्य देत असते, यापुढेही प्राधान्याने अंशतः अनुदानित आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षकांचे प्रश्न मार्ग लावण्यासाठी





प्रयत्नशील राहणार असल्याचे मत माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांनी बीड जिल्हा अंशतः अनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार प्रसंगी बोलताना सांगितले. शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम यांच्यासह वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांचा कृती समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. याबाबत अधिक माहिती अशी की, राज्य सरकारने राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना वाढीव २० टक्के अनुदान मंजूर केले. सदर वाढीव २० टक्के **पान २ वर**

## रोड रॉबरी प्रकरणात सोनू जाधव व जयपाल भालेराव यांना जामीन मंजूर

**लोकनायक वृत्तसेवा –**बीड जिल्ह्यातील चर्चेतील रोड रॉबरी प्रकरणात अटक करण्यात आलेले आरोपी सोनू जाधव व जयपाल भालेराव यांना जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांनी जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात आरोपींच्या वतीने प्रभावीपणे युक्तिवाद ॲड. योगेश टेकाडे पाटील (जिल्हा व सत्र न्यायालय, बीड) यांनी केला असून त्यांना ॲड. वैभव होळकर यांनी सहकार्य केले. सदर गुन्हा दिनांक ०६ सप्टेंबर २०२५



रोजी अतालुक्यातील कझ पेट्रोल पंप, बरड फाटा परिसरात घडला होता. फिर्यादी ऋषिकेश अंबादास उत्तेकर (वय २६ वर्षे, व्यवसाय चालक, रा. व्यंकटेश नगर, इंदापूर, जि. पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ते चाकण पुणे येथून अंबाजोगाईकडे प्रवासी भाडेकरू घेऊन प्रवास करत होते.त्यावेळी गाडीतील दोन प्रवाशांनी अचानक फिर्यादीवर हल्ला करून त्याच्या गळ्यातील अडीच तोळ्यांची सोन्याची साखळी व रोख रुपये ₹५,००० जबरदस्तीने चोरून नेले. हल्लयात फिर्यादीच्या डोळा, चेहरा व मानेवर धारदार शस्त्राने वार करण्यात आले होते. **पान २ वर**













This Newspaper Printed by Owner , Printer , Publisher **Editor BHARAT DEVIDAS GAIKWAD Chief Editor - Abheejit GAIKWAD** at **Indradhanush Printers and publishers** , Near Post Office , Peth Beed , Khadkpura, Beed 431122 ( Maharashtra ) and Published AT.**The office of Dainik Loknayak** , Near Post Office , Peth Beed , Khadkpura, Beed 431122 ( Maharashtra )

७६ हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक **भारत देविदास गायकवाड,**कार्यकारी-संपादक **अभिजित गायकवाड** यांनी **इंद्रधनुष्य प्रिंटर्स अँण्ड पब्लिशर्स**, पोस्ट ऑफीसजवळ, पेठ बीड, खडकपुरा, बीड जि.बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय, पोस्ट ऑफीसजवळ, पेठ बीड, खडकपुरा, बीड जि.बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले.**निवासी संपादिका सौ .नायरा राज मुळे. पी.आर.बी.कायद्यानुसार ( सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत)** Mobile: 9850165082 / 9420406019 **E:mail : dainikloknayak@gmail.com**